3.4.1.

मविप्र समाजाचे,

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला भगवंतराव वाजे वाणिज्य महाविद्यालय, सिन्नर जि.नाशिक

## २५ जानेवारी राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त मतदान जनजागृती रॅली अहवाल

दि.२५/०१/२०१९

गुरुवर्य मामासाहेब दांडेकर कला भगवंतराव वाजे वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय सिन्नर जि. नाशिक अंतर्गत मतदार साक्षरता क्लब राज्यशास्त्र विभाग व सिन्नर तहसील कार्यालय यांच्यावतीने 25 जानेवारी हा राष्ट्रीय मतदार दिन विविध उपक्रमांनी आणि उत्साहात साजरा करण्यात आला त्यानिमित्ताने सिन्नर शहरात मतदान जनजागृती रॅली आयोजित केलेली होती तसेच वक्तृत्व आणि निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ दिलीप शिंदे उपप्राचार्य प्रा. आर. व्ही. पवार, राज्यशास्त्र विभाग प्रमुख प्रा. अरुण पोटे, समन्वयक प्रा. राजेंद्र आगवाने, संयोजक प्रा. पी. के .शिंदे प्रा श्रीमती ए. आर. पगार, डॉ. डी. एल. फलके, डॉ. अशोक भवर, डॉ एस एन पगार, अशोक डिंबर, श्री तिडके, श्री एस आर भामरे इत्यादी शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. यानिमित्ताने वक्तृत्व आणि निबंध स्पर्धा घेण्यात आली त्यासाठी जागृत मतदार लोकशाहीचा आधार, मतदान अधिकार की कर्तव्य, मतदान नैतिकता, सहज मतदार नोंदणी सहज दुरुस्ती, निवडणूक प्रक्रियेतील सर्वसमावेशक व गुणात्मक सहभाग हे विषय स्पर्धेसाठी देण्यात आले होते. वक्तृत्व स्पर्धेमध्ये केदार शंकर मनोहर, आव्हाड तुषार मारुती, जाधव अनुजा विष्णू व सपकाळ हर्षाली नामदेव यांनी वक्तृत्व स्पर्धेत उत्कृष्ट सादरीकरण केले. तसेच घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेत हिरा राजाराम सदगीर, खेताडे पूजा बळवंत, गोडगे दिपाली चंद्रभान व माळी मोनिका दत्तात्रय यांनी उत्कृष्ट निबंध लिहिले. तसेच राज्यशास्त्र विभागाच्या वतीने सिन्नर शहरातून आडवा फाटा, सिन्नर बस स्थानक, महात्मा फुले पुतळा मार्गे तहसील कार्यालय अशी रॅली काढून मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो, वोट डालने जाना है अपना फर्ज निभाना है, मतदान हेच सर्वश्रेष्ठ दान, जागृत मतदार लोकशाहीचा आधार, यासारख्या घोषणा देत सिन्नर शहरवासीयांचे प्रबोधन केले तहसील परिसरात रॅलीची सांगता करण्यात आली. या रॅलीचे स्वागत तहसीलदार मा.नितीन गवळी, नायब तहसीलदार मा. नरेंद्र वाघ, पोलीस निरीक्षक श्री मुकुंद देशमुख यांनी केले. तहसील परिसरामध्ये माननीय तहसीलदार यांनी प्रबोधन करताना मतदान हे लोकशाहीच्या यशस्वी वाटचालीसाठी आवश्यक आहे. आठरा वर्ष पूर्ण झालेल्या तरुणांनी आपले मतदार नाव नोंदणी केली पाहिजे मतदानाचा अधिकार विवेकबुद्धीने केला पाहिजे लोकशाहीमध्ये मतदानाचे महत्त्व त्यांनी पटवून सांगितले. तसेच याप्रसंगी निबंध वक्तृत्व रांगोळी चित्रकला स्पर्धेतील उत्कृष्ट विद्यार्थ्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.शेवटी उपस्थितांनी आपल्या देशाच्या लोकशाही परंपरेचे जतन करणे, मुक्त, निष्पक्षपाती व शांततापूर्ण वातावरणातील निवडणुकांचे पावित्र्य राखू व प्रत्येक निवडणुकीत निर्भयपणे तसेच धर्म, वंश, जात, भाषा यांच्या विचारांच्या प्रभावाखाली न येता किंवा कोणत्याही प्रलोभनास बळी न पडता मतदान करू या आशयाची शपथ घेतली व कार्यक्रम संपन्न झाला.

| प्रा राजेंद्र अगवाने | प्रा अरुण पोटे | प्राचार्य डॉ. दिलीप शिंदे |
|---|---|---|
| समन्वयक | विभागप्रमुख | प्राचार्य |

HEAD
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
G.M.D. Arts, B.W. Commerce
And Science College, Sinnar

प्राचार्य
जी. एम. डी. आर्टस् बी. डब्ल्यु. कॉमर्स
अॅण्ड सायन्स कॉलेज, सिन्नर, जि. नासिक.

Scanned by CamScanner

## कार्यक्रमाचे फोटो










HEAD
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
G.M.D. Arts, B.W. Commerce
And Science College, Sinnar

Scanned by CamScanner







HEAD
DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE
G.M.D. Arts, B.W. Commerce
And Science College, Sinnar

Scanned by CamScanner